**आतील पानात वाचा**

- महापालिका निवडणुकीतही पुन्हा तोच गोंधळ !
- अहिल्यानगर महानगरपालिकेवर युतीचा झेंडा!
- कणकवली तालुक्यातील कलमठ ग्रामपंचायतीचा स्वागतार्ह निर्णय...



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : १५५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१७ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मुंबई-ठाण्यात महायुतीची मुसंडी ! ठाकरे बंधूंची खेळी अपयशी !




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** काल मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांचे निकाल जाहिर झाले आहेत. मुंबईत भाजप - शिंदे महायुतीला मोठं यश पाहायला मिळत आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी लाईव्ह येत त्यांची प्रतिक्रिया दिली आहे. ठाण्यामध्ये मतदारांनी स्पष्ट बहुमत दिलं आहे. त्यासाठी मी ठाणेकरांना धन्यवाद देतो, मुंबईकरांनीही महायुतीला बहुमताचा जो आकडा लागतो तो दिला आहे. त्यासाठी मी मुंबईकरांनाही धन्यवाद देतो. मुंबई एमएमआरमध्येही महायुतीला चांगलं यश मिळताना दिसत आहे. मुंबईत आम्ही विकासाच्या नावावर या निवडणुका लढवल्या आणि जिंकलो, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

राज्यात देखील मेजोरीटीमध्ये महापालिकांमध्ये महायुतीचे महापौर होतील, एकंदरीत राज्यातलं वातावरण महायुतीच्या बाजूने राहिलं आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, मुंबई जिंकलं आहे. मुंबईत शिवसेनेने मोठी मुसंडी मारली आहे. मुंबईत चांगली सुरुवात झाली. महायुतीचा महापौर होईल. काही लोकांनी ही निवडणूक भावनेच्या आधारावर लढली आहे. तरीसुद्धा मतदारांनी महायुतीलाच निवडलं आहे. गेल्या साडेतीन वर्षातील आमचं मुंबईतील काम, मी मुख्यमंत्री असताना, फडणवीसांचं मुख्यमंत्री म्हणून सुरु असलेलं काम, रस्ते, असतील किंवा अनेक थांबवलेली कामं यांना आम्ही चालना दिली.

२५ वर्षे ज्या लोकानी मुंबईत सत्ता राबवली, त्यांच्या विरोधात मुंबईकरांनी मतदान केलं आहे. लोकांनी आता विकासाला स्विकारलं आहे. ज्यांनी विकासाला नाकारलं त्यांना मतदारांनीही नाकारलं आहे. डेव्हलपमेंट हा ब्रँड मुंबईकरांनी स्विकारला आहे, भ्रष्टाचाराचे मुद्दे लोकांसमोर आणले गेले तरी आम्ही सत्तेजवळ पोहोचलो आहेत, असं शिंदे म्हणाले आहेत.

आता मुंबईचा विकास ज्या जोरात व्हायला पाहिजे ते पाहता. आता केंद्रात, राज्यात, आणि आता मुंबई महापालिकेतही महायुतीचा महापौर होईल त्यामुळे आता चांगला विकास करता येईल. मुंबई हे जागतिक दर्जाचं शहर झालं पाहिजे असं मोदीजी सांगतात, तसं आता झालं पाहिजे, मुंबई जशी लोकांना हवी आहे.

मुंबई खड्डे मुक्त, प्रदुषण मुक्त, ट्रॅफिकमुक्त करण्यासाठी आता काम करता येईल. आम्ही अगोदरच याबद्दल काम करतो आहोत, असंही यावेळी शिंदेंनी स्पष्ट केलं आहे.

# नाकर्तेपणा झाकण्यासाठी पालकमंत्र्यांवर आरोप : आ.काशिनाथ दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर शहराची पाणीपुरवठा योजना पालकमंत्र्यांनी अडवली असल्याचा आरोप हा स्वतःचा नाकर्तेपणा झाकण्याचा केविलवाणा प्रयत्न असुन पारनेर शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटीलांनी योजना अडवली असल्याचे खोटे आरोप केले जात असून, हा प्रकार म्हणजे स्वतःच्या नाकर्तेपणावर पडदा टाकण्यासाठी केलेला केविलवाणा आणि दिशाभूल करणारा प्रयत्न असल्याचे आ. काशिनाथ दाते यांनी केले. प्रत्यक्षात आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पारनेर शहरासाठी मागिल एक वर्षात १८ कोटी ७१ लक्ष रुपयांचा विकासनिधी उपलब्ध झाला असून, या सर्व कामांना पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांची मोलाची साथ व सहकार्य लाभलेले आहे.

विकासकामांना निधी उपलब्ध करून देताना पालकमंत्र्यांनी कधीही दुजाभाव केला नाही, ही वस्तुस्थिती जनतेला माहीत आहे.

पारनेर शहराचा विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी विशेष मदत केली असल्याचेही आ. दाते यांनी सांगितले.

> “दुर्दैवाने आमदार दाते यांच्या माध्यमातून शहरासाठी मंजूर झालेली अनेक विकासकामे पारनेर नगरपंचायतमधील सत्ताधारी मंडळींनी राजकीय द्वेषापोटी अडवून ठेवली आहेत. यामुळेच पारनेर शहराच्या विकासाला मोठी खीळ बसलेली असून, त्याची जबाबदारी दुसऱ्यांवर ढकलण्याचा हा केवळ निष्फळ प्रयत्न आहे. आज पारनेर नगरपंचायतमधील सत्ताधाऱ्यांचे नेतृत्व हे आमदारपद भूषवून, तसेच राज्यात सत्तेत असतानाही त्यांनी पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी नेमके कोणते ठोस प्रयत्न केले, हा प्रश्न जनतेला पडलेला आहे. पारनेर शहराला पाणी आणल्याशिवाय पारनेर शहरात पाय ठेवणार नाही आणि मतही मागायला येणार नाही, सत्ता असूनही जर मूलभूत गरज असलेली पाणी योजना पूर्ण करता आली नसेल, तर त्याची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी इतरांवर आरोप करणे हे राजकीय अपरिपक्वतेचे द्योतक आहे.
>
> **- वसंतराव चेडे,**
> **माजी जि.प.सदस्य पारनेर**

> ● पारनेर शहराचा विकास हा आमदार दाते यांचा प्रामाणिक ध्यास असून, राजकारणापेक्षा शहराच्या हिताला प्राधान्य देऊन ते सातत्याने काम करत आहेत. विकासकामांना अडथळे आणणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे आणि पारनेरच्या जनतेची दिशाभूल थांबवावी,
>
> **- पै. युवराज पठारे,**
> **नगरसेवक नगरपंचायत पारनेर**

# भाजपला सर्वात मोठा धक्का, ८४ पैकी फक्त २ जागा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नाशिक :** राज्यातील महापालिकांचे निकाल आता स्पष्ट होताना दिसत आहेत. यामधील महत्त्वाच्या शहरांपैकी असणाऱ्या मुंबई, पिंपरी आणि पुणे महापालिकेमध्ये भाजपने जवळपास बाजी मारली आहे. सत्तेत एकत्र असतानाही या मिनी विधानसभा समजल्या जाणाऱ्या महापालिका निवडणुकीमध्ये मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आपली सर्व ताकद लावली होती. पुणे आणि राष्ट्रवादीमध्ये तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत सर्व ताकद लावली पण जनतेने काका-पुतण्यांना नाकारल्याचं चित्र दिसलं. भाजपने करेक्ट कार्यक्रम करत घवघवीत यश मिळवलं, भाजप अनेक महापालिकांच्या चाव्या आपल्याकडे ठेवण्यात यशस्वी झालं असलं तरी एका महापालिकेत मात्र फक्त दोन जागांवर त्यांना विजय मिळवता आला आहे.

भाजपने या पालिकेमध्य जवळपास २० जागांवर निवडणूक लढवली होती. मात्र अवघ्या २ जागांवर त्यांना समाधान मानावं लागलं आहे. विशेष म्हणजे शिंदे सेनेने १८ जागांवर विजय मिळवलाय. इतका मोठा उलटफेर कोणत्या पालिकेतच झाला आहे जाणून घ्य. मालेगाव महापालिकेमध्ये एकूण ८४ जागा आहेत. यापैकी इस्लाम पार्टीने ३४ जागांवर विजय मिळवला तर त्यांची एक जागा बिनविरोध आली होती. एमआयएमच्या २०, समाजवादी पार्टी ६, काँग्रेसने ३ जागांवर विजय मिळवला आहे. एमआयएम पक्षाला त्यांचा आत्मविश्वास नडला, आसिफ शेख यांच्याविषयीच्या सहानुभूतीचा इस्लाम पार्टीला फायदा झाल्याचं बोललं जात आहे. आसिफ शेख हे मागे पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये अवघ्या १६५ मतांनी पडले होते. त्याचाच फायदा आता झाल्याची चर्चा आहे. शिंदेंच्या सेनेला मिळालेल्या यशाचं श्रेय त्यांचे शिलेदार मंत्री दादा भुसे यांना जातं आहे. दरम्यान, या निवडणुकीमध्ये इस्लाम पार्टी आणि समाजवादी पक्षाने सेक्यूलर पार्टीने आघाडी केली होती. आता दोन्ही पक्ष एकत्र येत सत्ता स्थापन करतील.

# पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात जगतापांचा करिष्मा!

## चिंचवडमध्ये ३९, भोसरीत ३५, पिंपरीत १२ जागांवर कमळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, पिंपरी- चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणात जगताप कुटुंबीयांचा करिष्मा आजही कायम असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. २०१७ मध्ये दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये ऐतिहासिक परिवर्तन घडवत भाजपची निर्विवाद सत्ता प्रस्थापित केली होती. शहराच्या स्वाभिमानावर उभ्या राहिलेल्या त्या नेतृत्वाचा प्रभाव २०२६ च्या महापालिका निवडणुकीतही ठळकपणे दिसून आला. यंदाच्या पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुका भाजपाचे निवडणूक प्रचार प्रमुख आणि चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. या निवडणुकीतही भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत शहरात पुन्हा एकदा कमळ फुलवले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडून १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर झाला. या निकालात भाजपने ८५ जागांवर विजय मिळवला, तर राष्ट्रवादी काँग्रेसला ३७ आणि शिवसेनेला ६ जागांवर समाधान मानावे लागले. यापूर्वीच्या सर्व महापालिका निवडणुका लक्ष्मण जगताप यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पार पडत होत्या. २०२३ मध्ये त्यांच्या निधनानंतर ही पहिलीच महापालिका निवडणूक होती. संपूर्ण शहरावर त्यांची पकड आणि संघटनशक्ती होती, हे वारंवार सिद्ध झाले आहे. तोच संघटनात्मक करिष्मा यंदाच्या निवडणुकीतही पुन्हा दिसून आला.


२०२६ ची महापालिका निवडणूक चिंचवड मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली लढवली गेली. निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून त्यांच्यावर संपूर्ण शहराची जबाबदारी सोपवण्यात आली होती. या संधीचे सोने करत शंकर जगताप यांनी भाजपची निर्विवाद सत्ता पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवडमध्ये खेचून आणली. आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणात अडकलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विरोधात भाजपाने आपला यशाचा ‘ग्राफ’ कायम राखला.




निकालानुसार चिंचवड मतदारसंघातून भाजपाने ३९ जागांवर विजय मिळवला, भोसरी मतदारसंघात ३५ तर पिंपरी मतदारसंघात १२ जागांवर भाजपाचे उमेदवार विजयी झाले. या यशामध्ये शंकर जगताप यांच्या प्रभावी संघटनकौशल्याचा आणि नियोजनबद्ध प्रचाराचा मोठा वाटा असल्याचे स्पष्ट होते.

लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या निधनानंतर ही पहिलीच महापालिका निवडणूक होती. त्यांची उणीव आम्हाला नक्कीच जाणवत होती. मात्र त्यांनी दिलेले विचार आणि शहराचा विकास हेच अंतिम ध्येय मानून आम्ही काम केले. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील हा विजय सुज्ञ मतदारांचा विजय आहे. विकासाला विरोधाची झालर चढवण्याचा प्रयत्न झाला, मात्र मतदारांनी तो ठामपणे फेटाळला. शहराच्या विकासाचे महत्त्व मतदारांना चांगलेच समजले आहे, अशी प्रतिक्रिया शंकर जगताप यांनी दिली.

# फुलंब्रीत दुर्दैवी घटना! माहेरच्यांचा सासरच्यांवर गंभीर आरोप




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, फुलंब्री :** तालुक्यातील वानेगाव येथे ३१ वर्षीय विवाहितेचा विहिरीत बुडून मृत्यू झाल्याच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली. सासरच्या मंडळींनी मारहाण करून तिला विहिरीत फेकल्याचा आरोप माहेरच्या नातेवाइकांनी केला. नातेवाइकांनी केलेल्या आरोपांमुळे वातावरण तणावपूर्ण बनले.

आरोपींवर गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी, या मागणीसाठी मृत विवाहितेच्या नातेवाइकांनी फुलंब्री पोलिस ठाण्यासमोर मृतदेह ठेवून साडेचार तास ठिय्या आंदोलन केले. अखेर सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर रात्री साडेअकरा वाजता वानेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिस ठाण्यासमोर मृतदेह ठेवून ‘आरोपींना अटक करा व खुनाचा गुन्हा दाखल करा,’ अशी जोरदार मागणी नातेवाइकांनी केली. पोलिस निरीक्षक संजय सहाणे, सहायक पोलिस निरीक्षक सुनील इंगळे यांनी समजावण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, दंगा काबू पथक तैनात करण्यात आले.

# महापालिका निवडणुकीतही पुन्हा तोच गोंधळ !



राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान यंदा गोंधळातच पार पडले. तब्बल ८ वर्षानंतर निवडणूक लागल्याने यंदा मुंबई-ठाणे वगळता मतदारांमध्ये कमालीचा उत्साह होता. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले. मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती करूनही दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. मुंबईतील मतदानाचा टक्का काही वाढला नाही. लोकसभा, विधानसभा यानंतर आता महापालिका निवडणुकांतही निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे मतदारांचे नाहक हाल झाले. महापालिका वार्डांच्या पुनर्रचनेमुळे कितीतरी मतदारांची नावे विभागली गेली. ज्यामुळे मतदारांना आपली नावे शोधण्यासाठी एका मतदान केंद्रावरून दुसऱ्या मतदान केंद्रावर फेऱ्या माराव्या लागत होत्या. कित्येक मतदारांची नावे मतदार याद्यांमधून गायब झाली होती.

मुंबईतील घर भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये राजकीय पक्षांच्या बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी विधानसभा निवडणुकीला मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का ? भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात ? मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते ? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे ? विधानसभा निवडणुका झाल्यानंतर महापालिकेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता. या काळात याद्या अद्यावत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला.

शहरांत दरवेळी मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत असते. यंदा सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही ठिकाणी अर्धा अर्धा तास कमी केल्याचे अनेकांना ज्ञात नव्हते त्यामुळे मतदान करून सकाळी लवकर कामावर जाणाऱ्यांसह नागरिकांना मतदान केंद्रांवर सकाळी अर्धा तास विनाकारण तिष्ठत राहावे लागले. वेळेचे गणित बिघडल्याने काहीजण मतदान न करताच कामावर जाताना दिसले. हीच स्थिती सायंकाळी पाहायला मिळाली. साडेपाचनंतर धावत पळत मतदान केंद्रांवर जाणाऱ्यांना मतदान न करताच परतावे लागले. दुबार मतदारांमुळे अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती झालेली पाहायला मिळाली.

या निवडणुकीत मतदान यंत्राच्या शेजारी व्हीव्हीपॅट यंत्र पाहायला न मिळाल्याने आपले मत नक्की आपल्या उमेदवारालाच गेले आहे कि अन्य कोणाला असा प्रश्न मतदारांना पडत होता. अनेक ठिकाणी निवडणूक कर्मचारी कामात मुद्दामहून दिरंगाई करताना दिसून आले ज्यामुळे मतदान अत्यंत धीम्या गतीने होत होते अशा ठिकाणी मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या ज्यामुळेही काही मतदार मतदान न करताच मागे फिरकताना पाहायला मिळाले. मतदारांच्या बोटाला शाई लावण्यासाठी यंदा पहिल्यांदाच मार्करचा वापर करण्यात आला होता. ही शाई सॅनिटायजर लावून जात असल्याने बोगस मतदान होण्यासाठीच ही नवीन पद्धत निवडणूक आयोगाने वापरली का असा थेट सवाल राजकीय नेत्यांकडून निवडणूक आयोगाला करण्यात येत होता. काही ठिकाणी यंदा पहिल्यांदाच पॅनल पद्धत अवलंबली गेल्याने आणि अनेक नागरिकही या नवीन पद्धतीविषयी अनभिदक्य असल्याने गोंधळ निर्माण झालेला पाहायला मिळाला. या नव्या पद्धतीमुळे मतदान केंद्रावर मतदारांचा बराच वेळ जात होता ज्यामुळे अशा ठिकाणी मतदारांच्या लांब रांगा लागलेल्या पाहायला मिळाल्या. हल्ली प्रत्येक निवडणुकीतील निवडणूक आयोगाचा हा भोंगळ कारभार नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी अविश्वास तर निर्माण करतोच, शिवाय बोगस मतदानासही वाव मिळवून देत आहे असे मत राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले गेले आहे. याशिवाय अनेक मतदार याद्यांमध्ये महिला मतदाराच्या नावासमोर पुरुषाचे छायाचित्र तर पुरुष मतदारांच्या नावापुढे महिलेचे छायाचित्र लावल्याचे दिसून आले. काही ठिकाणी ईव्हीएम मशिन्स बंद पडल्याने मतदारांचा संताप अनावर झालेला पाहायला मिळाला.

आपल्या जिल्ह्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही. नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात. केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का ? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या महापालिका निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## महाराष्ट्राचा विवेकी आवाज



फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा.डॉ. एन डी पाटील यांचा आज चौथा स्मृतिदिन. चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा.डॉ. एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले. प्रा.डॉ.एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. (१९६२) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा.डॉ. एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा.डॉ.एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा.डॉ. एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला. शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा.डॉ. एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते. आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा.डॉ.एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा.डॉ.एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, कॉंग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा.डॉ. एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा.डॉ. एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

## मंडणगड तालुक्यातील ५ विद्यार्थी नासा व इस्त्रो अंतराळ संशोधन संस्थांना भेट देणार

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.१४, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील बाणकोट, गोठे, कोण्हवली, चिंचघर आणि वाल्मिकी नगर या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत शिकणाऱ्या एकूण ५ विद्यार्थ्यांची नासा आणि इस्त्रो येथील अंतराळ संशोधन संस्थाना भेट देण्यासाठी निवड झाल्याने तालुक्यातील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, ग्रामस्थ, शिक्षक आणि शिक्षण प्रेमी आदींसह अखंड मंडणगड तालुक्यातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनचा, कौतुकाचा वर्षाव होत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांमधून शास्त्रज्ञ घडावा यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाच्या गुणवत्ता कक्षाने नासा इस्त्रो सफर हा उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधन संस्थेला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची भेट देण्याचा जिल्हा वार्षिक योजनेच्या कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील एकूण ५ विद्यार्थ्यांना त्यांच्या एकूण चौकस बुद्धी वैज्ञानिक दृष्टिकोन चिकाटी आणि जिज्ञासा यांच्यातील अंगी बांधलेल्या त्यांच्यातील एक निष्ठेमुळे यावर्षी संधी उपलब्ध झाली आहे. यामध्ये तालुक्यातील इस्त्रो भेटीसाठी शार्दुल राकेश पणदीरकर (इयत्ता सहावी) वाल्मिकी नगर येथील रुंजी विश्वनाथ जाधव (इयत्ता पाचवी) चिंचघर येथील श्रेया दयाळ चिंचघरकर (इयत्ता सहावी) तर गोठे नंबर १ ची विद्यार्थिनी अपेक्षा सुनील बोत्रे (इयत्ता सातवी)आणि मानस प्रशांत जाधव (इयत्ता सातवी) बाणकोट प्राथमिक शाळा या दोन विद्यार्थ्यांची नासा आणि इस्त्रो भेटीसाठी निवड झाली आहे. त्यामुळे मंडणगड सारख्या एका दुर्गम तालुक्यातील विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानातील प्रगत तंत्रज्ञान जवळून पाहण्याची संधी मिळणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत देखील आजही दर्जेदार शिक्षण मिळते हे या विद्यार्थ्यांच्या निवडीने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## विंचूर ग्रामपंचायतीत 'दैनिक अक्षराज'च्या दिनदर्शिकेचे उत्साहात प्रकाशन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील ग्रामपंचायत कार्यालयात 'दैनिक अक्षराज'च्या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचा (कॅलेंडर) प्रकाशन सोहळा नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी विंचूरचे विद्यमान सरपंच सचिन दरेकर, ग्रामसेवक आर. एम. मगर, तसेच विद्यमान ग्रामपंचायत सदस्य नाना जेऊघाले, मुख्य लिपीक राजू शिंदे, मिलिंद वाघ आणि इम्रान मोमीन, शरद जेऊघाले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, या सोहळ्यासाठी दैनिक अक्षराजचे नाशिक जिल्हा प्रतिनिधी सुनील क्षिरसागर आणि पत्रकार रोहन सरोदे हे देखील उपस्थित होते.

या सर्व मान्यवरांच्या हस्ते 'दैनिक अक्षराज'च्या दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या या छोटेखानी कार्यक्रमात उपस्थितांनी दैनिकाच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जनादेश

मावळे सज्जलढाया
कोण अडवी उत्कर्षा
अडथळे असे कायम
दोस्त मानतो संघर्षा

हव्यास नाही खुर्चीचा
कधी नसे अभिलाषा
सत्तेविना पर्याय नाही
जाणीव आता प्रकर्षा

आंदोलने चर्चाविमर्शा
केलेली घोर निराशा
प्राप्त करण्या उद्दिष्टा
बदलावी लागते दिशा

स्वता उतरावे स्पर्धेत
मानले जनता आदेशा
निर्णय घ्यावे आपणचं
मान जनांच्या आवेशा

आपले आहे हक्काचे
का पहायची भाग्यरेषा
इप्सित सिध्दी जरूरी
जरा बदलून पाहू पेशा

शुध्दीत आणूं बेशुध्दा
समोरच्या चढली नशा
उजळू लागे आताउषा
संपून जाई गडद निशा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## कणकवली तालुक्यातील कलमठ ग्रामपंचायतीचा स्वागतार्ह निर्णय !

तळकोकणाच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील कलमठ ग्रामपंचायतीने पतीच्या निधनानंतर स्त्रीचे सौंदर्य, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या अमानवी विधवा प्रथेला ठाम नकार देत एक ऐतिहासिक आणि समाजपरिवर्तनकारी निर्णय घेतला असल्याची बातमी वाचनात आली. तो निर्णय निश्चितच स्वागतार्ह म्हणावा लागेल. ज्या घरामध्ये विधवा प्रथा पाळली जाणार नाही, अशा कुटुंबांची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्याचा ठराव ग्रामपंचायतीने सर्वानुमते मंजूर केला असून, या निर्णयाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त या निर्णयाची अधिकृत घोषणा करण्यात आली. विधवा प्रथा म्हणजे पतीच्या निधनानंतर स्त्रीवर लादली जाणारी सामाजिक बंधने, तिच्या आयुष्याला काळ्या छायेत ढकलणारी प्रथा, मंगळसूत्र काढून घेणे, बांगड्या फोडणे, कुंकू पुसणे, रंगीत कपडे न घालण्याची सक्ती, आनंदाच्या कार्यक्रमांपासून दूर ठेवणे असे अमानवी कुप्रकार आजही काही भागांत दिसून येतात. या प्रथेमुळे स्त्रीचे केवळ सौंदर्यच नव्हे, तर तिचा आत्मसन्मान, व्यक्तिमत्त्व आणि सामाजिक अस्तित्वही नाकारले जाते. कलमठ ग्राम पंचायतीचे सरपंच संदीप मेस्त्री यांनी २०२५ च्या वर्षअखेरीस अध्यक्षपदावरून यासंबंधी ठराव मांडला. 'महिला स्नेही गाव' या संकल्पनेवर आधारित काम करत असताना, विधवा प्रथा बंदीसाठी ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याचे त्यांनी सभेत स्पष्ट केले. कोणत्याही सामाजिक प्रथेपेक्षा माणुसकी श्रेष्ठ असून, स्त्रीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, या भावनेतून हा निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले आहे. यापुढे कलमठ गावात विधवा प्रथा पूर्णतः बंद करण्यासाठी ग्रामपंचायत कसोशीने प्रयत्न करेल हा निर्णय केवळ कलमठपुरता मर्यादित न राहता राज्यभरातील गावांसाठी हा निर्णय प्रेरणादायी ठरावा सद्या राजकारणाची दिशा बदलत असताना सरपंच संदिप मेस्त्री यांचे हे क्रांतीकारी पाऊल लोकप्रतिनिधींबद्दलच्या पारंपारिक प्रतिमेला छेद देणारे आहे .

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पाटण येथे ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन साजरा

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण (सातारा) :** भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते 'ऑलिम्पिक वीर' खाशाबा जाधव यांचा जन्मदिन क्रीडादिन येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये क्रीडा विभाग व आय. क्यू.ए.सी यांच्या सयुक्त विद्यमाने उत्साहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांनी खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.दीपक डांगे -पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व्ही.ए.कळंत्रे होते. यावेळी आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.एच.व्ही.काटे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.दीपक डांगे-पाटील म्हणाले की ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव हे कठोर परिश्रम, चिकाटी, आणि आत्मविश्वासाच्या बळावर सर्वांचे पदी पोहचले. प्रतिकूल परिस्थितीत ही त्यांनी हेलिंस्की ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक मिळवून देशाला गौरविले. आजच्या तरुण पिढीने त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि देशाभिमानाची जोपासना करावी, खाशाबा जाधव यांनी देशाला ऑलिम्पिक पदक देऊन मान दिला. आता आपण त्यांच्या स्मरणाचा मान राखून, त्यांच्या आदर्शांना जपून, आपल्या जीवनात तंतोतंत उतरविणे हे आपले कर्तव्य आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज किमान एक तास शारीरिक क्रियाकलापांना द्यावा, आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवावा आणि कोणत्याही परिस्थितीत हार न मानण्याची वृत्ती विकसित करावी.असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.ए.कळंत्रे म्हणाले की, खाशाबा जाधव यांचे यश भारतीय क्रीडा इतिहासातील सुवर्णिम पान आहे. महाविद्यालयीन जीवनात अभ्यासाबरोबरच क्रीडा व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांत सहभागी होणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.अनिल पाटील यांनी खाशाबा जाधव यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा आढावा घेत त्यांच्या अविश्वसनीय साधनसंपत्तीतून मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचे महत्त्व सांगितले. प्रा.एस.के.संकपाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमात प्राध्यापक विद्यार्थी, प्रशसकीय सेवक मोठ्या संखेने उपस्थित होते. या निमित्ताने महाविद्यालयात एक प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात विद्यार्थी प्रतिनिधी आणि क्रीडा विभाग यांचा सक्रिय सहभाग होता.

## जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा उत्साहपूर्ण प्रारंभ



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, बुलडाणा :** शासकीय कामकाजात जशी सांघिक भावना आवश्यक आहे, तशीच ती खेळातून ही अधिक दृढ होते. जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा, उत्तम आरोग्य व मित्रत्वाची भावना रुजविणारा उपक्रम असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित स्पर्धांचे उद्घाटन पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजासोबतच क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आरोग्य व खेळाडूवृत्ती जपावी, असे आवाहन केले. उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील व पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी स्वतः क्रिकेट खेळत षटकार लगावत स्पर्धेला उत्साहात सुरुवात केली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन तहसिलदार वृषाली केसकर व शिवानंद वाकदकर यांनी केले.

## 'हिंद दी चादर' कार्यक्रमाचा विभागीय आयुक्त पापळकर यांच्याकडून आढावा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, छ. संभाजीनगर :** श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'हिंद दी चादर' या कार्यक्रमाच्या तयारीचा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज सविस्तर आढावा घेतला. या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासनाने दक्षतेने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला दुरदृष्य प्रणालीद्वारे नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह विभागातील महसूल, शिक्षण, आरोग्य, माहिती यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त कार्यालयात अपर आयुक्त मंजुषा मिसकर, नगर प्रशासन विभागाचे देविदास टेकाळे यांच्यासह संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

आढावा बैठकीत कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती उपक्रम, प्रभात फेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा-सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता व आरोग्य सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्याग, शौर्याचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन आयुक्त श्री. पापळकर यांनी केले. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष काळजी घेऊन कार्यक्रम शिस्तबद्ध, शांततापूर्ण व उत्साहात पार पाडावा यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. तसेच सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करावे, प्रत्येक विभागाने प्रचार व प्रसाराचे नियोजन करावे असे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले. 'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, सद्भावना व ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हिंद दी चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी बैठकीस विभागातील जिल्हा प्रशासनातील अधिकारी, आरोग्य, शिक्षण यांच्यासह विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर महानगरपालिकेवर युतीचा झेंडा



**पक्षांतर्गत बलाबल (एकूण ६८ जागा)**
**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) : २७ जागा**
**भारतीय जनता पक्ष (भाजप) : २३ जागा**
**शिवसेना (एकनाथ शिंदे गट) : १२ जागा**
**काँग्रेस : ०२ जागा**
**एमआयएम : ०२ जागा**
**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) : ०१ जागा**
**बहुजन समाज पार्टी : ०१ जागा**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** २ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर पार पडलेल्या अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीचा निकाल अखेर स्पष्ट झाला आहे.

या निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) महायुतीने निर्भेळ यश संपादन करत महापालिकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ६८ जागांच्या सभागृहात युतीने बहुमताचा आकडा सहज पार केला असून, विरोधकांचा दारूण पराभव झाला आहे.

या निवडणुकीत माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप या जोडगोळीने केलेली रणनीती यशस्वी ठरली आहे. या विजयानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बंगल्यावर कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली असून, गुलाल उधळत आणि फटाके फोडून जल्लोष केला जात आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः कार्यकर्त्यांसोबत या उत्सवात सहभागी होऊन विजयाचा आनंद साजरा केला.

या निवडणुकीत सर्वात मोठा धक्का राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि मनसेला बसला आहे. शरद पवार यांच्या पक्षाला शहरात एकही जागा जिंकता आली नाही, तर राज ठाकरे यांच्या मनसेलाही खाते उघडण्यात अपयश आले आहे. महायुतीने मिळवलेल्या यशामुळे शहराच्या विकास कामांना वेग येईल, असा विश्वास युतीच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे.

## परराज्यातील मद्य वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्कची धडक कारवाई

### ३७ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त; एक आरोपी अटकेत



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१६, पालघर :** राज्य उत्पादन शुल्क विभाग, डहाणू विभाग व भरारी पथक, पालघर यांच्या संयुक्त कारवाईत परराज्यातील मद्याच्या अवैध वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या या कारवाईत ३७ लाख ३० हजार ४०० रुपये किमतीचा मद्यसाठा व एक वाहन जप्त करण्यात आले असून एका आरोपीविरोधात वारस गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. ही कारवाई जव्हार-नाशिक मार्गावरील साकी हॉटेलसमोर, जव्हार तालुका, जिल्हा पालघर येथे करण्यात आली. दादरा-नगर हवेली, दमण व दीव या केंद्रशासित प्रदेशामध्ये विक्रीस असलेले परराज्यातील मद्य महाराष्ट्रात बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही संयुक्त मोहीम राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान एका आयशर कंपनीच्या एम-बूस्टर प्लस ई-सीरीज टेम्पो (क्रमांक चक०३-ड-८५३५) मधून मोठ्या प्रमाणावर मद्यसाठा आढळून आला. तपासणीअंती या वाहनातून

विदेशी मद्य - १३७३.७६ बल्क लिटर, बियर - ६७२.०० बल्क लिटर, असा एकूण २१५ बॉक्स मद्यसाठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी एकूण १ गुन्हा दाखल, १ वारस गुन्हा, १ आरोपी अटक करण्यात आली असून कोणताही बेवारस गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही.

जप्त केलेल्या मद्यसाठ्यासह वाहनाची एकूण किंमत सुमारे ३७,३०,४०० रुपये असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून देण्यात आली आहे. दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध मद्यविक्री व वाहतुकीविरोधात पुढील काळातही अशाच प्रकारच्या कडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी बेकायदेशीर मद्य विक्रीबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे, असे आवाहन ही करण्यात आले आहे.

## टाकळीढोकेश्वर येथे जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवास प्रारंभ

### बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी बाल महोत्सव उपयुक्त - न्यायाधीश पैठणकर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** समाजाच्या मुख्य प्रवाहातील बालकांना शिक्षण, कला व कौशल्य विकासाच्या अनेक संधी सहज उपलब्ध होतात. मात्र निराधार व निराश्रित बालकांना या संधी हमखास मिळतीलच असे नाही. अशा बालकांच्या कला, क्रीडा व सुप्त गुणांना वाव देण्यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सव अत्यंत उपयुक्त ठरत आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव सचिव जिल्हा प्रमुख जिल्हा व न्यायाधीश योगेश पैठणकर यांनी केले.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील आदर्श ग्रामीण महिला मंडळ संचलित नवीन गोकुळ बालसदन मैदानावर महिला व बाल विकास विभागांतर्गत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत आयोजित तीन दिवसीय जिल्हास्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवाचे उद्घाटन आज शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी न्यायाधीश योगेश पैठणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बालकल्याण समितीचे अध्यक्ष ॲड.जयंतराव ओहोळ, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब खिलारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम,बालकल्याण समितीच्या सदस्या ॲड. अनुराधा येवले, बालकल्याण समिती सदस्य तुषार कवडे, सीएसए संस्थेच्या जुई झावरे, आदर्श ग्रामीण महिला मंडळ अध्यक्षा मंगल झावरे, ॲड. संतोष वाळुंज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

न्यायाधीश पैठणकर म्हणाले की, मुलांना घडविणे हे शिक्षकांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. बालकांचा बौध्दिक व शारीरिक विकास घडवून आणण्यासाठी, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अशा बाल महोत्सवांची नितांत गरज आहे. या महोत्सवात बालकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहणे आनंददायी असून, यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी महिला व बाल विकास विभागाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाला जिल्ह्यातील ३८ शासकीय व सोयंसेवी संस्थांमधील बालकांनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सरस्वती व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थितांना बालविवाह प्रतिबंधाची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमानंतर न्यायाधीश योगेश पैठणकर यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिविक्षा अधिकारी रावसाहेब झावरे यांनी तर आभार मंगल झावरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला व बालविकास अधिकारी संजय कदम व चाईल्ड लाईन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पालकमंत्री डॉ.भोयरांच्या हस्ते अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाचे जिल्हास्तरीय उद्घाटन




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, भंडारा :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सिकलसेल आजाराचा जास्त प्रादुर्भाव असलेल्या राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येत असून, त्यामध्ये भंडारा जिल्ह्याचा समावेश आहे. या अनुषंगाने जिल्हा आरोग्य विभागामार्फत भंडारा जिल्ह्यात दिनांक १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

या अभियानाचे जिल्हास्तरीय उद्घाटन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते फीत कापून, दीपप्रज्वलन व माहिती पुस्तिकेचे अनावरण करून उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी सावनकुमार, पोलीस अधीक्षक नुरुन हसन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद सोमकुंवर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संदीप गजभिये, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अतुल टेभूर्णे, जिल्हा माहिती अधिकारी शैलजा वाघ, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी अनिल बनकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अजिंक्य आंबाडकर, कार्यक्रम समन्वयक रोहिणी पवार आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सिकलसेल ॲनिमिया हा पिढ्यानपिढ्या काही समुदायांमध्ये आढळणारा गंभीर आजार असून, त्याचे प्रमाण विशेषतः विदर्भात अधिक आहे. या आजाराच्या नियंत्रणासाठी व भविष्यात समूळ उच्चाटनासाठी जनजागृती आणि तपासणी अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनाने अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच नागरिकांनी स्वतःसह कुटुंबातील सर्व सदस्यांची तपासणी करून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

# खारेपाट भीषण पाणी टंचाई समस्येची पोलखोल

## इंडिया आघाडीतर्फे वडखळ जिल्हा परिषद गटात निवडणूक लढविणार



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१६, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील वाशी वडखळ विभागातील १३ ग्रामपंचायती हद्दीतील ७० हजार लोकवस्ती ला येत्या आठवडाभरात आठवड्यातून एक दिवस पाणी पुरवठा होणार असल्याचे पत्र संबंधित सरपंच, प्रशासकांना जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयने पाठविल्याने संतप्त झालेल्या माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती संजय जांभळे यांनी आज दुपारी ३ वाजता तातडीने पत्रकार परिषदेत स्थानिक लोकप्रतिनिधीचे पाणी टंचाई समस्येवर उपाययोजना न केल्यामुळे जनतेला तीव्र पाणीटंचाई समस्येला जानेवारी महिन्यापासून सामोरे जावे लागणार असल्याने या समस्येवर आता जनतेने उठाव करून आगामी निवडणुकीत हा मुद्दा लोक प्रतिनिधी समोर ठेऊन यांना गाव बंदी करावी असे खारेपाटातील जनतेला पत्रकार परिषदेतून आवाहन केल्याने ऐन जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूकीचत पाणी टंचाई समस्येची पोलखोल केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापणार आहे.

केंद्र व राज्य शासनाची जल जीवन मिशन योजनेतील निकृष्ट कामामुळे जनतेला पाणी मिळत नाही. जे जलकुंभ बांधलेत त्यात अजूनही थेंबभर पाणी सोडले गेले नाही. काही ठिकाणी जलकुंभ लिकेजेस असल्याने यात झालेला करोडोचा भ्रष्टाचार याबाबत जनतेने आवाज उठविण्यासाठी या निवडणुकीत सज्ज रहाण्याचेही त्यांनी आवाहन केले. ३८ कोटीची योजनेचा बोजवारा उडाला असून आठवड्यात दोन वेळा पाईपलाईन ब्रेक होऊन पाणीपुरवठा विस्कळीत होतो गेली २५वर्ष पाणी टंचाईचा सामना खारेपाटातील जनतेला उन्हाळ्यातील पाच महिने सोसावा लागतो. उपाययोजनेबाबत स्थानिक नेत्यांनी याकडे का लक्ष दिले नाही. हेटवणे धरण भूमीगत कालव्याचे कामामुळे शेतकरी बांधवांचे उन्हाळ्यातील शेती लागवड नसल्याने उत्पन्न बुडाले आहे. खरीप हंगामातील उत्पादन अतिवृष्टी सततचा पाऊस पडल्याने मातीमोल झाले. अशा परिस्थितीत पाणी टंचाई संकट जनतेच्या जीवावर उठत असल्याने एक जनतेचा सेवक म्हणून मी याबाबत खारेपाटातील जनतेच्या पाठीशी या समस्येची लढा देण्यासाठी सुदैव तत्पर राहीन असे सांगितले.

याबाबत पत्रकारांनी आपण निवडणूक उमेदवारी करणार का या प्रश्नावर उत्तर देताना इंडीया आघाडीच्या नेत्यांनी मला याबाबत बोलवून विचारणा केली आहे. वडखळ जिल्हा परिषद मतदार संघाचे मी दोन टर्म मधे प्रतिनिधित्व करुन बांधकाम सभापती पद सांभाळले आहे. नेतेमंडळीची गरज व जनतेला माझ्या उमेदवारीची गरज लक्षात घेऊन इंडिया आघाडीचे नेते याबाबत बैठक घेऊन विचारविनिमय करीत आहेत. माझी उमेदवारी त्यांना आणि जनता जनार्दनाला हवी आहे. त्यामुळे दोन दिवसांत याबाबत अपेक्षीत निर्णय शेकापचे भाई जयंत पाटील घेतील त्या वेळी आपणास सांगितले जाईल. पण उमेदवार म्हणून मी जनतेसाठी उभा राहणार हे निश्चित आहे.

संजय जांभळे यांची जिल्हा परिषद वडखळ गटात उमेदवारी ही मोठी लक्षणीय बाब ठरणार असून भाजपा महायुतीसाठी ती आव्हानात्मक ठरणार आहे. पाणी टंचाई हा सध्या मोठा भीषण प्रश्न समस्या असून याबाबत प्रशासन व लोकप्रतिनिधी काय उपाययोजना करतात याकडे मी अधिक लक्ष केंद्रित करीन. निवडणूका दर पाच वर्षांनी येतात जातात पण जनतेसाठी काम करणारा धावून जाणारा सच्चा लोकप्रतिनिधीची निवड हाच माझा आज पत्रकार परिषदेतून जनतेला मतदारांना आवाहन आहे. नेत्यांच्या भूलथापांना बळी पडू नका आठवड्यात एकदा पिण्याचे पाणी हे खारेपाटातील जनतेसाठी गंभीर समस्यांचे प्रतिक असल्याचं त्यांनी शेवटी सांगितले.

# चेरपोली कॅनल ब्रिजवर भीषण अपघात; २६ वर्षीय पादचाऱ्याचा जागीच मृत्यू



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१६, शहापूर (ठाणे) :** नाशिक – मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०३ वर शहापूर तालुक्यातील चेरपोली गावाजवळील कॅनल ब्रिज परिसरात शुक्रवार, दि.१६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ६.५० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला.

नाशिकच्या दिशेने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने पादचाऱ्याला जोरदार धडक दिल्याने एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात वैभव गोपाळ मलिक उर्फ सोन्या (वय २६), रा. साई दर्शन सोसायटी, वडाळा, अँटॉप हिल, मुंबई यांचा मृत्यू झाला. वैभव हा यंग बॉईज स्पोर्ट्स क्लब, अँटॉप हिल यांचा सदस्य असून, सायन (मुंबई) येथून शिर्डीकडे पालखी सोहळ्यासाठी पायी प्रवास करत होता. आसनगाव रेल्वे स्थानक येथे मुक्काम केल्यानंतर सकाळी तो इतर सदस्यांसह महामार्ग ओलांडत असताना हा अपघात घडला.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस मदत केंद्र, चेरपोली (शहापूर) येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक छाया कांबळे, तसेच पोलीस हवालदार आवटे, सांगळे, पानसरे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जखमी अवस्थेतील वैभव यास खाजगी रुग्णवाहिकेद्वारे उपजिल्हा रुग्णालय, शहापूर येथे दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

अपघातानंतर काही काळ महामार्गावर वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी तात्काळ वाहतूक सुरळीत करत परिस्थिती नियंत्रणात आणली. सदर अपघात शहापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने पुढील तपास शहापूर पोलीस करीत आहेत. अपघातास कारणीभूत असलेल्या अज्ञात वाहनाचा शोध सुरू आहे.

# रामकथा ही प्रत्येकाच्या मनापर्यंत पोहोचली पाहिजे - आ.मुनगंटीवार

## श्रीराम कथेच्या निमित्ताने चंद्रपुरात भव्य शोभायात्रा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** रामकथेच्या माध्यमातून संस्कार, अस्मिता आणि मर्यादांचे महत्त्व समाजमनात दृढपणे रुजते. पितृधर्माचे पालन करणारे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम हे आदर्श पुत्र असून, त्यांचे जीवन मानवतेला योग्य दिशा देणारे आहे. दि.१४ ते २२ जानेवारी या कालावधीत दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत श्री लखमापूर धाम, चांदा क्लब ग्राऊंड, चंद्रपूर येथे ही श्रीरामकथा पार पडणार आहे. त्यामुळे जीवनातील नऊ दिवस श्रीरामकथा श्रवणासाठी अर्पण करून ही पवित्र कथा प्रत्येकाच्या मनापर्यंत पोहोचली पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. श्रीरामकथेच्या पावन निमित्ताने लक्ष्मीनारायण मंदिरापासून चांदा क्लब ग्राउंडपर्यंत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. या शोभायात्रेत आ. सुधीर मुनगंटीवार, सपनाताई मुनगंटीवार आणि मोठ्या संख्येने रामभक्त सहभागी झाले होते. शोभायात्रेदरम्यान मोठ्या संख्येने रामभक्तांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली असून, संपूर्ण परिसर 'जय श्रीराम'च्या घोषणांनी भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीरामचंद्र यांच्या पावन जीवनगाथेवर आधारित श्रीरामकथा दि. १४ ते २२ जानेवारी या कालावधीत भक्तिभावाने आयोजित करण्यात आली आहे. या पवित्र कथा सोहळ्यात परमपूज्य श्री. राजन महाराज हे ग्रामकथेचे वाचक म्हणून उपस्थित राहून श्रीरामकथेचे रसपूर्ण व भावस्पर्शी कथन करणार आहेत.

यावेळी आ.सुधीर मुनगंटीवार म्हणाले, प्रभू श्रीराम हे संस्कार, अस्मिता, मर्यादा आणि पितृधर्माचे पालन करणाऱ्या आदर्श पुत्राचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन मानवतेला योग्य मार्गदर्शन करणारे आहे. रामकथा ही प्रत्येकाच्या मनापर्यंत पोहोचली पाहिजे. कारण रामकथेतून जीवन जगण्याची योग्य दिशा, संस्कार आणि मूल्यांची खरी शिकवण मिळते. या शोभायात्रेच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक मनापर्यंत प्रभू श्रीरामांची पावन कथा पोहोचवण्याचे महान कार्य झाले आहे. प्रभू श्रीराम हे संस्कारांचे प्रतीक, अस्मितेचे अधिष्ठान, मर्यादांचे पालन करणारे आणि पितृधर्म निष्ठेने निभावणारे आदर्श पुरुष आहेत. दुष्ट प्रवृत्तीचा नाश करणारे आणि संकटमुक्तीचा मार्ग दाखवणारे प्रभू राम प्रत्येक भक्ताच्या जीवनात संकटमोचक म्हणून सदैव उपस्थित असल्याचे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले. अयोध्येतील प्रभू श्रीराम भक्तांना ज्या महाद्वारातून आशीर्वाद देतात, ते महाद्वार चंद्रपूर येथून पाठविण्यात आलेल्या काष्ठापासून निर्माण झाले आहे. चंद्रपूर वासीयांसाठी हा गौरवाचा क्षण असल्याचे ही आ.मुनगंटीवार म्हणाले. समुद्र पार करण्यासाठी प्रभू श्रीरामांच्या सेनेने उभारलेला रामसेतू, 'राम' नाम अंकित दगडांचे पाण्यावर तरंगणे, तसेच रामकथेतील प्रत्येक शब्दातील अद्भुत शक्ती यांचा उल्लेख करत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी रामकथा प्रत्येक मनापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. सत्य आणि धर्माच्या विजयासाठी आवश्यक ती शक्ती रामकथेतूनच मिळते, असेही त्यांनी सांगितले.

# 'एकल' महिलांच्या सन्मानार्थ हळदीकुंकू सोहळा संपन्न; 'विधवा व एकल' महिलांचा सन्मान



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील ग्राम पंचायत कार्यालयात नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'एकल महिलांचा सन्मान' या अभियानांतर्गत विशेष महिला मेळावा आणि हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधीलकी जपत विधवा, परित्यक्ता आणि एकल महिलांसाठी हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. दि.१६ जानेवारी २६ रोजी सायं. ४ वाजता पार पडलेल्या या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, हा सोहळा विशेषतः विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत आणि एकल महिलांसाठी आयोजित करण्यात आला होता. समाजात या महिलांना मानाचे स्थान मिळावे आणि त्यांचाही सण-समारंभात सक्रिय सहभाग असावा, या उदात्त हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे उपस्थित महिलांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान पाहायला मिळाले.

या कार्यक्रमासाठी विंचूरचे सरपंच सचिन दरेकर, पं समिती सुपरवायझर वंदना खांदवे, ग्रामपंचायत अधिकारी आर. एम. मगर, ग्रामपंचायत सदस्या पूजा जेऊघाले आणि सुमन दरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमास सुनीता शेलार, तुळसा राजगुरू, मंगल राऊत, सोनाली करमासे, नंदा जेजुरकर, वैशाली बागले, सुमन शिरसाट, सोनाली शिरसाठ, दिपाली धारराव, वैशाली चव्हाण यांच्यासह गावातील सर्व अंगणवाडी सेविका आणि ग्रामपंचायत कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन ग्राम पंचायतीच्या वतीने अत्यंत छान करण्यात आले होते.

# थोडक्यात

## के.रामलू शाळेच्या १७ विद्यार्थ्यांनी नॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षेत गोल्ड मेडल पटकावले



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१६, कुंडलवाडी (नांदेड) :** बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील के. रामलू शाळेतील विद्यार्थ्यांनी नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या नॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. नुकतेच नॅशनल सायन्स ओलंपियाड स्पर्धा परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाले असून यामध्ये के.रामलू शाळेतील इयत्ता १ली मधून शेनपुंजे आराध्या, गादगे आयांश, रामपुरे शिवांश, कममवार रुद्रा, गादगे पृथ्वीराज तसेच इयत्ता २री मधून सोलापुरे समर्थ, दाचावार सृजन, सय्यद मुबासिर, कम्ममवार प्रणित, देवाले आरुषी, नरवाडे आदर्श, होरके श्रीनिधी, यन्नावार श्रुतिका, शेख यजान, पाशावार गौरवी, गणरोड अभिनव, शेख जीशान इत्यादी मुलांनी गोल्ड मेडल पटकावले आहे व मोरे लावण्या, पवार तन्मय, वलसांगवीकर आरुष, कोंडावार रत्नेश, कोंडावार अनुष्का इत्यादी विद्यार्थ्यांना पार्टिसिपेशन सर्टिफिकेट प्रमाणपत्र सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत मिळणार असून या सर्व विद्यार्थ्यांना अश्विनी तुंगेनवार, लतिका जडलवार, संध्या पाठक, विकास मिसाळे, कृपेश पडकूटलावार या शिक्षकांनी मार्गदर्शन केले आहे. या शाळेतून एकूण २२विध्यार्थी या परीक्षेत बसले होते त्यापैकी १७ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल मिळाले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कुरवार, प्रिंसिपल जे संभाजी व्हाय प्रिंसिपल एम सपना, शिक्षक, पालक, नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

## मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्यावतीने छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१६, सोलापूर (वैराग) :** छत्रपती संभाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धेच नव्हते, तर उच्च कोटीचे विद्वान, कवी व दूरदृष्टीचे राज्यकर्ते होते. आजच्या तरुणांनी जर संभाजी महाराजांना आपले आयडॉल मानले, तर देशाचे भविष्य निश्चितच उज्ज्वल होईल, असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष आनंद काशीद यांनी केले. वैराग येथे मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते. काशीद म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर अत्यंत प्रतिकूल परिस्थिती ओढावली होती. अशा कठीण काळात आदिलशाही, मुघलशाही, निजामशाही व कुतुबशाही या सर्व शक्तींशी एकाच वेळी झुंज देत संभाजी महाराजांनी स्वराज्याचे रक्षण तर केलेच, पण स्वराज्याचा विस्तार ही दुप्पट वाढवला. याशिवाय संभाजी महाराज हे अत्यंत बुद्धिमान व अभ्यासू होते. त्यांनी सातसतक, नायिका भेद, नखशिख आणि बुद्धभूषण असे चार महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. युद्धकौशल्यासोबतच ज्ञान, साहित्य व राज्यकारभारातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे. संभाजी महाराजांच्या जीवनकार्याचा अभ्यास आजच्या तरुणांनी केला, तर ते देशाला योग्य दिशा देऊ शकतील, असेही काशीद यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीला दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी वैराग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, सामाजिक कार्यकर्ते राजे निंबाळकर, मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष धनंजय गरड, विक्रम बापू घायतिडक, अभिजीत मोरे, विकास गरड यांच्यासह मोठ्या संख्येने शंभूप्रेमी उपस्थित होते. हा राज्याभिषेक सोहळा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी कमलाकर ताटे, महेश खेंदाड आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमामुळे वैराग परिसरात शंभूराजे प्रेमींच्या उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' राज्यात सुरू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, मुंबई :** महिलांचे आरोग्य केंद्रस्थानी ठेवत राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच शहरी भागांमध्ये 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात आले आहेत. असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले. आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, मेनोपॉज म्हणजे महिलांच्या आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा. या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण, हॉर्मोन असंतुलन, हाडांचे आजार, झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर दुर्लक्ष होत होते. हीच गरज ओळखून राज्य शासनाने महिलांसाठी 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले की, या क्लिनिकच्या माध्यमातून, तज्ज्ञांकडून वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन, हाडे, हृदय व हॉर्मोन तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. देशात प्रथमच अशा प्रकारचे 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या आरोग्याबाबत राज्य शासनाने उचललेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. मेनोपॉज हा आजार नाही, तर महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे.

मात्र या टप्प्यात महिलांना शारीरिक आणि मानसिक आधाराची अत्यंत गरज असते. राज्यातील प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, यासाठीच मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले असल्याचे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.